ZPGADC-13014/5/2026-WCD

**महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद, गडचिरोली**

**Email :- icdscellgad@gmail.com**

**महिला समुपदेशन केंद्र सुरु करणबाबत जाहीरात**

**(शासन निर्णय क्र. संकिर्ण-2025/प्र.क्र.169/E1144526 यो-11, दिनांक 30 मे 2025)**

कुटुंबातील मारहान, लैगिक छळ व इतर समस्येने त्रासलेल्या तसेच मानसिकदृष्ट्या असंतुलित महिलांच्या सामाजिक, मानसशास्त्रीय, कायदेशीर समुपदेशनासाठी, महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद, गडचिरोली च्या मार्फतीने सन 2026-27 या वित्तीय वर्षात प्रकल्प कार्यालय कुरखेडा-1 व सिरोंचा-1 असे एकुण 2 महिला समुपदेशन केंद्र सुरु करावयाचे आहे त्यानुषंगाने स्वयेसेवी संस्थेमार्फत सदर केंद्र चालण्याबाबतचे प्रस्ताव या कार्यालयास **दिनांक :-** 30/11 /2026 पर्यंत सायंकाळी 4.00 वाजेपर्यत सादर करावे.

**सदर बाबतची सविस्तर जाहीरात व संबंधित अटी व शर्ती खालील प्रमाणे**

1. संस्था नोंदणी अधिनियम 1860 व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र
   आवश्यक आहे. (नोंदणी प्रमाणपत्राच्या छायांकित व साक्षांकित प्रती जोडाव्यात.)
2. नोंदणीकृत संस्था महिला समुपदेशन केंद्रांना किमान 1 ते 3 वर्षाचा कामकाजाचा अनुभव असावा.
3. संस्थेकडे महिला समुपदेशनाचे काम करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध असणे आवश्यक आहे.
4. मागील तीन वर्षाचा आडीट रिपोर्ट 2023-24 ,2024-25, 2025-26 असावे.
5. संस्थेचे स्वतःचे सुस्वच्छ कार्यालय असावे.
6. विधि सल्लागार या पदाकरीता शिक्षण पात्रता LLB आवश्यक आहे. तसेच 5 वर्षाचा अनुभव आवश्यक आहे.
7. समुपदेशकासाठी या पदाकरीता शिक्षण पात्रता MSW आवश्यक आहे. तसेच किमान 3 वर्षाचा अनुभव आवश्यक आहे.
8. शासन निर्णयानुसार तालुकास्तरीय केंद्रासाठी 1 **समुपदेशक + 1 विधी सल्लागार** आवश्यक. तालुकास्तरीय केंद्रासाठी समुपदेशक व विधी सल्लागार यांना प्रत्येकी कमाल ₹9,000 प्रतिमाह मानधनाची तरतूद आहे.
9. एक संस्थेला एकापेक्षा जास्त केंद्रे मंजूर करता येणार नाही.
10. समुपदेशन केंद्राचा खर्च भागविण्यासाठी संस्थेची आर्थिक क्षमता असावी.
11. समुपदेशन केंद्रासाठी आवश्यक व्यवहारीक कौश्यल्य असणारा प्रशिक्षित कर्मचारी वर्ग संस्थेकडे उपलब्ध असावा
12. विहीत नमुन्यातील अर्ज
13. संस्थेच्या योजना व कार्यबाबतचा मागील 3 वर्षाचा वर्षनिहाय वार्षिक अहवाल.
14. संस्थेचा मागील तीन वर्षाचा सनदी लेखापालाची स्वाक्षरी असलेला वर्षनिहाय लेखा परिक्षण अहवाल.
15. संस्थेने समुपदेशनाचे कार्य केल्याबाबतचा कार्याचा स्वतंत्र अहवाल, सांख्यिकी माहीतीसह.
16. संस्थेचे मागील तीन महिन्याचे महिनानिहाय बँक स्टेटमेंटस
17. संस्था नोंदणी अधिनियम 1860 आणि मुंबई सार्वजनीक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्राच्या छायांकित व साक्षांकित प्रती जोडाव्यात.
18. संस्थेची घटना व नियमावली (घटनेत महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणे हा उददेश असावा.) ची साक्षांकित प्रत
19. कर्मचारी वर्गाचे शैक्षणिक पात्रता व अनुभवाचे प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती जोडाव्यात.
20. संस्थेचे वेळोवेळी आयोजित केलेल्या कार्यक्रमाची छायाचित्र/कागदपत्रे/वृत्तपत्रातील कात्रणे जोडावी.
21. संस्थेच्या कार्यरत पदाकरीता व कार्यकारणीची नाव / पत्ता/व्यवसाय व दुरध्वनी क्रमांकासह यादी जोडावी.

22. हमी पत्र क्रमांक 1) संस्थेच्या कार्यकारी मंडळातील सदस्य एकमेकांचे नातेवाईक माहीती तसेच कोणीही सदस्य शासकिय सेवेत नसावे याबतचे हमीपत्र सोबत जोडावे.
23. हमी पत्र क्रमांक 2) शासनास सादर केलेल्या प्रस्तावामधील सर्व कागदपत्रे व माहीती खरी आहे, या बाबतचे हमीपत्र.
24. संस्थेच्या पदाधिका-याबाबत (अध्यक्ष व सचिव) उप विभागीय पोलीस अधिकारी यांचे स्वाक्षरीस विना दुराचार प्रमाणपत्र.
25. संस्थेच्या नावाने संस्थेबाबत जन सामान्याच्या तक्रारी नाहीत संस्थेबाबत गैरव्यवहाराच्या तक्रारी नाहीत, ठराव.
26. संस्थेने सार्वजनिक संपतीचा अपहार केलेला नाही याबाबत जिल्हाधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र.
27. संस्थेने शासनाच्या कोणत्याही विभागाकडून काळ्या यादीत (Blacklisted) नसल्याचे स्वयंघोषणापत्र.
28. शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र.
29. अपूर्ण अथवा आवश्यक कागदपत्रे नसलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.
30. प्रस्ताव विहित मुदतीनंतर प्राप्त झाल्यास स्वीकारला जाणार नाही.
31. कोणत्याही टप्प्यावर चुकीची/खोटी माहिती आढळल्यास संस्थेचा प्रस्ताव/निवड रद्द करण्यात येईल.
32. संस्था निवड झाली म्हणून शासनाकडून कायमस्वरूपी अनुदान/नियुक्ती/हक्क प्राप्त होणार नाही.
33. निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.
34. आवश्यकतेनुसार प्राप्त प्रस्तावांची प्रत्यक्ष तपासणी/पडताळणी करण्यात येईल.
35. कोणताही प्रस्ताव स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचा अंतिम अधिकार सक्षम प्राधिकाऱ्यास राहील.

इतर तपाशिलाकरीता या कार्यालयाच्या www.zpgadchiroli.org या संकेतस्थळावर संपर्क साधावा. ईच्छुक संस्थांनी विहीत नमुन्यातील अर्जासाठी व योजनेच्या तपशिलावर माहीतीसाठी जिल्हा कार्यक्रम अधिकारी महिला व बाल कल्याण विभाग जिल्हा परिषद, गडचिरोली या कार्यालयाशी संपर्क साधावा व आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह आपला अर्ज व परिपुर्ण प्रस्ताव सोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या अनुक्रमानिकेसह 3 प्रतित सदरची जाहीरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून 15 दिवसाचे आत या कार्यालयास सादर करावा.

सदर योजनेबाबतचे निर्णय घेण्याचे सर्व अधिकार या विभागाकडे राखुन ठेवण्यात आलेले आहे.

**सहपत्र:-** अर्जाचा नमुना

Digitally signed by
Suhas Laxman Gade
Date: 29-08-2026
15:17:21

(सुहास गाडे, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, गडचिरोली**

(दिपक बानाईत)
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.)**
**जिल्हा परिषद, गडचिरोली**

# महिला व बालकांवर होणाऱ्या अत्याचारास प्रतिबंध करण्यासाठी महिला समुपदेशन केंद्र सुरु करणे

## महिला समुपदेशन केंद्र

## अर्ज

| | | |
|---|---|---|
| 1 | संस्थेचे नांव | |
| 2 | संपुर्ण पत्ता | |
| 3 | दुरध्वनी क्रमांक | |
| 4 | संस्था नोंदणी क्रमांक व दिनांक | |
| 5 | संस्था प्रमुखाचे नांव | |
| 6 | PAN क्रमांक | |
| 7 | E-mail | |
| 8 | संस्थेच्या योजना व कार्याबाबतचा थोडक्यात तपशिल | |
| 9 | संस्थेमार्फत करण्यात येणाऱ्या समुपदेशन कार्याची माहीती (आकडेवारीसह) | |
| 10 | संस्था नोंदणी अधिनियम 1860 किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्थ व्यवस्था अधिनियम | |
| 11 | घटना व नियमावली | |
| 12 | संस्थेचे बैंक खाते क्रमांक बँकेचे नांव व पत्ता | |
| 13 | योजनेचे कार्यक्षेत्र व समुपदेशनाबाबत संस्थेचा ज्या पोलीस स्टेशनचे नांव व पत्ता | |
| 14 | संस्था व्यवस्थापकाचे नांव. हुददा व पत्ता:<br>दुरध्वनी क्रमांक:<br>भ्रमणध्वनी क्रमांक: | |
| 15 | महिला समुपदेशन क्षेत्रातील कामाचा अनुभवाचा तपशील | |
| 16 | समुपदेशन केंद्रासाठी प्रस्तावीत कर्मचारी वर्ग: | |
| 17 | संस्थेचे कार्यरत असलेल्या कर्मचारी वर्गाचा सविस्तर तपशिल: | |
| 18 | मागील तीन वर्षाचा संस्थेच्या कार्याचे लेखापरिक्षकांचा स्वाक्षरीचे लेखा विवरणपत्र: | |
| 19 | मागील तीन वर्षाचा संस्थेच्या कार्याचा वार्षिक अहवाल (सविस्तर व वर्षनिहाय) | |
| 20 | संस्थेने आयोजित केलेल्या कार्यक्रमांचे फोटोग्राफर/वृत्तपत्र कात्रणे. | |

(वरील अर्जात दिलेली माहिती ही सत्य असुन त्या पृष्टर्थ आवश्यक सर्व कागदपत्रांची साक्षांकित प्रती मी, प्रस्तावासोबत सादर केलेल्या आहेत.)

दिनांक :-

स्थळ :-

संस्थेचा शिक्का